# न्यूज एक्सप्रेस मराठी

मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल



बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!

: ९८३४१३८४८२




# बोऱ्हाडेवाडी परिसरातील 125 हेक्टरवरील टीपी स्कीम मंजूर

## दीड वर्षात होणार कायापालट; अनधिकृत बांधकामे न करण्याचे महापालिकेचे आवाहन

**पिंपरी | प्रतिनीधी**

बोऱ्हाडेवाडी परिसरातील १२५ हेक्टर क्षेत्रामध्ये बहुप्रतीक्षित नगररचना योजना (टीपी स्कीम) मंजूर झाली असून, नुकतेच पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत या विषयासंदर्भात कामकाज गतीमान करण्यासाठी अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. टीपी स्कीमचे कामकाज पूर्णत्वास नेण्यासाठी कायद्यानुसार निश्चित कालावधी मर्यादा ठरवून देण्यात आली असून, त्याच विहित मुदतीत हे संपूर्ण कामकाज पूर्ण केले जाणार आहे. या प्रक्रियेअंतर्गत सर्वप्रथम इरादा गॅझेटमध्ये पब्लिश करण्यात येईल. त्यानंतर पुढील महिन्यांत स्थानिक शेतकऱ्यांशी सविस्तर चर्चा करून ड्राफ्ट स्कीम प्रसिद्ध केली जाईल.

ही ड्राफ्ट स्कीम प्रसिद्ध करण्यापूर्वी नगररचना विभागाशी यांच्याशी रीतसर चर्चा करून ती पुढील मंजुरीसाठी शासनाकडे पाठवण्यात येणार आहे. कायद्याच्या तरतुदीनुसार टीपी स्कीम पूर्णत्वासाठी किमान दीड वर्षाचा कालावधी दिलेला असून, त्याच वेळेत सर्व सोयी-सुविधांची कामे केली जाणार आहेत. या योजनेच्या माध्यमातून कायद्याच्या तरतुदीनुसार विकसन योग्य भूखंड सर्व मूलभूत पायाभूत सुविधांसह मूळ शेतकऱ्यांना परत देण्यात येईल.

टीपी स्कीम प्रत्यक्ष राबविण्यापूर्वी प्रशासनाच्या वतीने सुरुवातीला बोऱ्हाडेवाडी परिसरात विशेष माहिती शिबिर राबविण्यात येणार आहेत. या माध्यमातून स्थानिक शेतकऱ्यांना टीपी स्कीमच्या स्वरूपाबाबत आणि कायदेशीर प्रक्रियेबाबत सविस्तर माहिती दिली जाईल. विशेष म्हणजे, बोऱ्हाडेवाडीमध्ये ज्या ठिकाणी ही टीपी स्कीम राबविली जाणार आहे, तो परिसर सध्या ग्रीनझोन (हरित पट्टा) आहे. नवीन विकास आराखड्यानुसार (डीपी) तो यलोझोन (निवासी क्षेत्र) दाखवला असला, तरी ही संपूर्ण प्रक्रिया सर्वसाधारण पद्धतीने पूर्णत्वास जायला किमान ५ ते ७ वर्षांचा



मोठा कालावधी जाऊ शकतो. मात्र, या भागात थेट टीपी स्कीम राबविल्यामुळे केवळ दीड वर्षातच हा सर्व परिसर अत्याधुनिक सोयी-सुविधांयुक्त होणार असून, यामुळे स्थानिक शेतकऱ्यांचा देखील मोठा फायदा होणार आहे.

नुकत्याच झालेल्या महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत बोऱ्हाडेवाडीचा टीपी स्कीमचा विषय मंजूर झाला आहे. त्यानुसार टीपीस्कीम होणार हे निश्चित झाले आहे. त्यामुळे नागरिकांनी या परिसरात अनधिकृतरित्या कुठलेही बांधकामे करून स्वतःचे नुकसान करून घेऊ नये. महापालिकेकडून पुढील महिन्यात आराखडा प्रसिध्द होणार आहे. त्यानंतर नियमानुसार कामे करावी असे आवाहन महापालिकेच्या संबधिंत विभागाच्या अधिकाऱ्यांकडून करण्यात आले आहे.

> बोऱ्हाडेवाडीतील टीपीस्कीमबाबत लवकरच आराखडा प्रसिध्द केला जाणार आहे. शेतकऱ्यांशीही चर्चा केली जाईल. त्यांच्या समस्या, त्यांच्या सूचना ऐकून घेतल्या जातील. आवश्यकतेनुसार आराखड्यात बदल करून पुढे पाठवला जाईल. त्यापूर्वी परिसरातील नागरिकांनी कुठलेही अनधिकृत बांधकाम, कामकाज करू नये. पुढील दीड वर्षामध्ये टीपीस्कीमचे कामकाज पूर्णत्वास नेण्याचे लक्ष आहे.
>
> - किशोर गोखले, नगरचना उपसंचालक, पिं-चिं मनपा

> बोऱ्हाडेवाडी परिसरातील ग्रीनझोनध्ये टीपीस्कीम राबविण्यासाठी २०१८ पासून पाठपुरावा केला आहे. या स्कीममुळे परिसराचा चांगल्या पध्दतीने कायापालट, विकास होण्यास मदत होणार आहे. संबधिंत अधिकाऱ्यांना ७०-३० या रेशोमध्येच ड्राफ्टस्कीम करण्यासाठी सांगितले आहे. त्यानुसारच शेतकऱ्याला मोबादला मिळणे आवश्यक आहे.
>
> - सारिका बोऱ्हाडे, नगरसेविका

> महापालिकेने ७०-३० च्या हिशोबानेच नियमावली करावी ही स्थानिक नगरसेवकांची आणि शेतकऱ्यांची आग्रही मागणी आहे. या योजनेमुळे बोऱ्हाडेवाडीच परिसराचा नियोजितबद्ध विकास होणार होईल.तसेच जमीन मोजणीबाबतचे वाद मिटतील. पुण्यातील डेक्कन जिमखाना आणि जंगली महाराज रस्ता सारख्या पूर्वी झालेल्या यशस्वी टीपी स्कीमच्या धर्तीवर पिंपरी-चिंचवड किंवा पुणे जिल्ह्यात प्रथमच अशा प्रकारची टीपी स्कीम राबवली जात असल्याने स्थानिक शेतकऱ्यांना याचा निश्चितच मोठा फायदा होईल.
>
> - निखील बोऱ्हाडे, नगरसेवक

# नीट पेपरफुटी प्रकरणाच्या निषेधार्थ आरसीसीच्या फलकाची तोडफोड

## संभाजी ब्रिगेडचे शहराध्यक्ष सतीश काळे यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरात नीट पेपरफुटी प्रकरणाचे पडसाद उमटू लागले असून, आरसीसी क्लासेसचे संचालक प्रा. शिवराज मोटेगावकर यांच्या आरसीसी फलकाची संभाजी ब्रिगेडच्या कार्यकर्त्यांकडून तोडफोड करण्यात आली. संभाजी ब्रिगेड पिंपरी-चिंचवड शहराध्यक्ष सतीश काळे यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन करण्यात आले. यावेळी पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी शिक्षण व्यवस्थेतील भ्रष्टाचाराविरोधात जोरदार घोषणाबाजी केली.

या वेळी संभाजी ब्रिगेडचे पिंपरी चिंचवड शहर अध्यक्ष सतिश काळे पुणे जिल्हा कार्याध्यक्ष भैय्यासाहेब गजधने ब्रह्मानंद जाधव,प्रसाद दौंडकर उपस्थित होते.

नीट -यूजी 2026 पेपरफुटी प्रकरणात आरसीसी क्लासेसचे संस्थापक प्रा. शिवराज मोटेगावकर यांना सीबीआयने अटक केल्यानंतर राज्यभरात संतापाची लाट उसळली आहे. मोटेगावकर हे महाराष्ट्रातील प्रसिद्ध कोचिंग संस्थांपैकी एक असलेल्या आरसीसीचे प्रमुख आहेत. लातूर पॅटर्नमधील मोठे नाव




म्हणून त्यांची ओळख होती. मात्र, पेपरफुटी प्रकरणात त्यांचे नाव समोर आल्यानंतर विद्यार्थ्यांसह पालकांमध्येही तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

याच पार्श्वभूमीवर संभाजी ब्रिगेडच्या कार्यकर्त्यांनी शहरातील आरसीसी संबंधित फलक फोडून निषेध नोंदवला. “विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळ करणाऱ्यांना माफी नाही”, “शिक्षण क्षेत्रातील माफियांवर कठोर कारवाई करा” अशा घोषणा देण्यात आल्या. सतीश काळे यांनी यावेळी बोलताना सांगितले की, लाखो विद्यार्थी प्रामाणिकपणे अभ्यास करून परीक्षा देतात. मात्र पैशांच्या जोरावर पेपरफुटी करून काही जण विद्यार्थ्यांचे भविष्य उद्ध्वस्त करत आहेत. अशा प्रवृत्तींचा निषेध म्हणून हे आंदोलन करण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

कार्यकर्त्यांनी केंद्र व राज्य सरकारकडेही या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी केली. तसेच नीट सारख्या राष्ट्रीय परीक्षांमध्ये वारंवार होणाऱ्या गैरप्रकारांमुळे विद्यार्थ्यांचा विश्वास ढासळत असल्याचे मत व्यक्त करण्यात आले. संबंधित आरोपींवर कठोर कारवाई करून शिक्षण क्षेत्र पारदर्शक करण्याची मागणी आंदोलकांनी केली.


दरम्यान, सीबीआय च्या तपासात आरसीसी संस्थेशी संबंधित काही महत्त्वाचे धागेदोरे समोर आल्याची चर्चा आहे. तपास यंत्रणांनी मोटेगावकर यांच्या निवासस्थानी व संस्थांमध्ये चौकशी केली असून, अनेक डिजिटल पुरावेही जप्त करण्यात आल्याचे वृत्त आहे.

# सोसायटीवरील ‘ॲमिनेटीज्’ कर आकारणी रद्द करा!

## चिखली-मोशी-पिंपरी-चिंचवड सोसायटी फेडरेशनची मागणी; आयुक्तांना निवेदन

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागाकडून सोसायट्यांमधील ओपन पार्किंग, खुल्या जागा, खेळाची मैदाने, क्लब हाऊस तसेच इतर ‘ॲमिनेटीज्’वर मालमत्ता कर आकारण्यात आल्याने शहरातील सोसायटीधारकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. या कर आकारणीचा तातडीने फेरविचार करून ती रद्द करण्यात यावी, अशी मागणी चिखली-मोशी-पिंपरी-चिंचवड सोसायटी फेडरेशनने केली आहे.


इंद्रायणी परिसर सोशल सोसायटीचे
चिखली-मोशी-पिंपरी चिंचवड हौसिंग सोसायटी फेडरेशन
(नोंदणी क्रमांक : महा./१२३६/२०२१/दिनांक : ०१/१०/२०२१)
अध्यक्ष
श्री. संजीवन सांगळे
मो. ८९७५१२८२३७७
पत्ता : गट नं.१११, जी.के. पॅलेसिओ सोसायटी, डी-६०४, बोऱ्हाडेवाडी, मोशी (पिंपरी-चिंचवड), पुणे - ४१२१०५.
Email ID : cmpcsocietyfederation@gmail.com

जावक क्र.: 341/2026 दिनांक : 19/05/2026

प्रति,
माननीय,आयुक्त,
पिंपरी चिंचवड मनपा
पिंपरी पुणे- 18

विषय- चालू आर्थिक वर्षापासून पिंपरी चिंचवड शहरातील सोसायट्याना सोसायट्यामधील असणाऱ्या मोकळ्या जागेवर, खुल्या पार्किंगवर (ओपन पार्किंग) हॉलीबॉल कोर्ट, खेळासाठीचे गार्डन यांच्यावर अमेन्टीज या नावाने चुकीच्या पद्धतीने लावलेला मालमत्ता कर रद्द करण्याबाबत..

माननीय महोदय,

वरील विषयानुसार आपणाला विनंती करण्यात येते की, चालू 2026 -27 या आर्थिक वर्षापासून पिंपरी चिंचवड शहरातील सोसायट्याना आपल्या महानगरपालिकेकडून सोसायटीमध्ये असणाऱ्या ओपन पार्किंग, खुल्या जागा, खेळासाठीचे गार्डन, क्लब हाऊस, हॉलीबॉल कोर्ट. अशा सर्व अमेनिटीज वर अतिशय चुकीच्या पद्धतीने कर आकारणी करण्यात आलेली आहे. सोसायटीमध्ये खुल्या असणाऱ्या जागेवर अशाप्रकारे कर आकारणी करणे अत्यंत चुकीचे आहे. महाराष्ट्रातील इतर कोणत्याही महानगरपालिकेमध्ये अशा पद्धतीने सोसायटीच्या ॲम्युनिटीज वर कर आकारणी केली जात नाही. तरी कृपया आपल्या कर आकारणी आणि कर संकलन विभागाकडून परत फेर सर्वेक्षण करून ही केलेली कर आकारणी रद्द करावी ही विनंती

प्रत योग्य ते माहितीसाठी..

1) श्री सचिन पवार, उपायुक्त कर संकलन आणि कर आकारणी विभाग पिंपरी चिंचवड मनपा पिंपरी पुणे 18

अध्यक्ष
चिखली-मोशी- पिंपरी चिंचवड
हाउसींग सोसायटी फेडरेशन मर्या.पुणे



या संदर्भात फेडरेशनच्या वतीने महानगरपालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांना निवेदन सादर करण्यात आले आहे. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, सोसायटी परिसरातील खुल्या व सामायिक स्वरूपाच्या जागांवर अशा प्रकारे स्वतंत्र कर आकारणी करणे अन्यायकारक असून, यामुळे प्रामाणिक करदात्यांवर अतिरिक्त आर्थिक भार पडत आहे.

फेडरेशनचे अध्यक्ष संजीवन सांगळे यांनी या निर्णयावर तीव्र आक्षेप नोंदवत सांगितले की, “सोसायटीधारक नियमितपणे मालमत्ता कर भरत असताना ओपन पार्किंग, गार्डन, खेळाची मैदाने आणि क्लब हाऊस यांसारख्या सुविधांवर वेगळा कर लादणे चुकीचे आहे. हा प्रकार तातडीने थांबवून लावलेला कर रद्द करावा, अन्यथा लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल.”

या मुद्द्यावर महानगरपालिकेकडून अद्याप कोणतीही अधिकृत भूमिका स्पष्ट करण्यात आलेली नाही. मात्र या कर आकारणीविरोधात सोसायटी फेडरेशनने एकत्रित भूमिका घेतल्याने शहरात या विषयावर मोठा वाद निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

> “पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेकडून सोसायट्यांमधील ओपन पार्किंग, गार्डन, क्लब हाऊस आणि खेळाची मैदाने यांसारख्या सामायिक सुविधांवर स्वतंत्रपणे ‘ॲमिनेटीज्’ कर लादणे हे पूर्णपणे अन्यायकारक आहे. सोसायटीधारक आधीच नियमित मालमत्ता कर भरत असताना त्यांच्यावर अतिरिक्त भार टाकणे योग्य नाही. हा निर्णय तातडीने रद्द करून फेरविचार करण्यात यावा; अन्यथा नागरिकांच्या हितासाठी लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडले जाईल.”
>
> - संजीवन सांगळे, अध्यक्ष, चिखली-मोशी-पिंपरी चिंचवड हाऊसिंग सोसायटी फेडरेशन.

# पेट्रोल पंप बंद असल्याची अफवा, नागरिकांनी पंपावर गर्दी करू नये

## पेट्रोल डीलर असोसिएशनचे आवाहन

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरातील ८० टक्के पेट्रोल पंप बंद असल्याच्या चर्चेमुळे नागरिकांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. मात्र, या सर्व चर्चा केवळ अफवा असून शहरातील पेट्रोल पंप नियमित सुरू असल्याचे स्पष्टीकरण पेट्रोल डीलर असोसिएशनचे अध्यक्ष ध्रुव रुपारेल यांनी दिले आहे.

गेल्या दोन दिवसांपासून शहरात इंधन तुटवडा निर्माण होणार, तसेच अनेक पेट्रोल पंप बंद राहणार असल्याच्या अफवा सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात पसरल्या होत्या. या चर्चांमुळे नागरिकांनी पेट्रोल पंपांवर मोठी गर्दी करण्यास सुरुवात केली होती. अनेक ठिकाणी वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्याचे चित्र पाहायला मिळाले.



याबाबत स्पष्टीकरण देताना ध्रुव रुपारेल यांनी सांगितले की, “पिंपरी-चिंचवड शहरातील ८० टक्के पेट्रोल पंप बंद असल्याची माहिती पूर्णपणे चुकीची आहे. काही ठिकाणी तांत्रिक किंवा स्थानिक कारणांमुळे एखादा पेट्रोल पंप तात्पुरता बंद असू शकतो. मात्र, शहरात इंधनाचा पुरवठा नियमित सुरू असून कोणतीही टंचाई नाही.” तसेच नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये आणि पेट्रोल पंपांवर अनावश्यक गर्दी टाळावी, असे आवाहनही असोसिएशनच्या वतीने करण्यात आले आहे. प्रशासनाकडूनही नागरिकांना संयम बाळगण्याचे आणि केवळ अधिकृत माहितीवरच विश्वास ठेवण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# खेड शिवापूरमधील अनधिकृत होर्डिंगवर हातोडा

**पिंपरी | प्रतिनिधी**

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (पीएमआरडीए) अनधिकृत बांधकाम निर्मूलन विभागाने अनधिकृत होर्डिंग आणि रस्ते अतिक्रमणांविरोधात सुरू ठेवलेले धडक कारवाईचे सत्र आणखी तीव्र केले आहे. 'पीएमआरडीए'ने मंगळवारी (१९ मे) हवेली (पश्चिम) तालुक्यातील खेड शिवापूर येथील एका मोठ्या रुग्णालयाचे अनधिकृत होर्डिंग हटवले असून, भूगाव ते घोटवडे फाटादरम्यान रस्ते अतिक्रमणविरोधी संयुक्त मोहीम राबवून रस्त्यावरील अतिक्रमणे हटविली आहेत.

हवेली तालुक्यातील मौजे खेड शिवापूर येथील गट क्रमांक ११४ मध्ये ‘मॅक्स न्यूरो हॉस्पिटल’ने विनापरवानगी अनधिकृत होर्डिंग उभारले होते. हे होर्डिंग अनधिकृत बांधकाम निर्मूलन विभागाच्या पथकाने पूर्णपणे निष्कासित केले. दरम्यान, 'पीएमआरडीए' आणि महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (एमएसआरडीसी) यांच्यावतीने मौजे भूगाव ते घोटवडे फाटा दरम्यान संयुक्त रस्ते अतिक्रमणविरोधी मोहीम राबवण्यात आली. या धडक कारवाईत रस्त्याला अडथळा ठरणारी अतिक्रमणे हटवण्यात आली. त्यामध्ये रस्त्यालगत बेकायदेशीरपणे उभारलेली सहा पत्रा शेड पूर्णपणे हटवण्यात आली. तसेच, रस्त्याच्या जागेत आलेली दोन सीमाभिंतींची (कंपाउंड वॉल) बांधकामे तोडण्यात आली. वाहतुकीला अडथळा ठरणारे आणि विनापरवानगी लावलेले १० छोटे जाहिरात फलक जप्त करण्यात आले.

'पीएमआरडीए'चे महानगर आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी यांच्या आदेशानुसार आणि अतिरिक्त महानगर आयुक्त के. मंजुलक्ष्मी यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. अनधिकृत बांधकाम निर्मूलन विभागाचे सहआयुक्त (प्रभारी) हिंमत खराडे यांच्या नेतृत्वाखाली तहसीलदार आशा होळकर, रवींद्र रांजणे आणि त्यांच्या पथकाने ही धडक मोहीम यशस्वीरीत्या पार पाडली. अतिक्रमणधारक आणि अनधिकृत होर्डिंगधारकांविरोधात यापुढेही सातत्याने अशीच कठोर कारवाई सुरू राहणार असल्याचे हिंमत खराडे यांनी स्पष्ट केले.

# पुनावळे-ताथवडे परिसरात धुळीचे साम्राज्य

## रस्ते रखडल्याने नागरिक त्रस्त, पालिका प्रशासनाकडून लवकरच उपाययोजनांचे आश्वासन







**पिंपरी | प्रतिनिधी**

प्रभाग क्रमांक २५ मधील पुनावळे आणि ताथवडे परिसरात सध्या सुरू असलेल्या विविध गृहप्रकल्प आणि रस्त्यांच्या कामांमुळे मोठ्या प्रमाणावर धुळीचे साम्राज्य पसरले आहे. या उडणाऱ्या धुळीमुळे स्थानिक नागरिक, लहान मुले आणि ज्येष्ठ नागरिकांना श्वसनाचे तसेच इतर आरोग्याचे गंभीर त्रास सहन करावे लागत आहेत. या पार्श्वभूमीवर, परिसरातील धूळ आटोक्यात आणण्यासाठी रस्त्यांवर नियमित पाण्याची फवारणी करावी आणि आवश्यक त्या सर्व उपाययोजना कराव्यात, अशी मागणी भाजपचे पिंपरी-चिंचवड शहर जिल्हा सचिव श्री. नवनाथ ढवळे यांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या पर्यावरण विभागाच्या मुख्य अभियंत्यांकडे एका पत्राद्वारे केली आहे.

या समस्येबाबत महापालिका प्रशासनाशी संपर्क साधला असता, संबंधित अधिकाऱ्यांनी वस्तुस्थिती मान्य करत काही तांत्रिक अडचणींमुळे या भागातील मुख्य रस्त्यांचे काम रखडल्याचे स्पष्ट केले. यामध्ये एमएसईबीची हाय टेन्शन लाईन खाली घेणे आणि स्थानिक नागरिकांच्या विरोधामुळे बॉक्स बसवण्यास झालेला उशीर, यामुळे कामाला गती मिळू शकली नाही. तसेच, 'पिक अवर' रहदारीच्या वेळी दरम्यान या भागात जड वाहनांना बंदी असल्याने काम करण्यासाठी मर्यादित वेळ मिळतो, तर रात्रीच्या वेळी काम करताना आवाजामुळे स्थानिक नागरिकांच्या तक्रारी येतात, अशी अडचण प्रशासनाकडून मांडण्यात आली.

उडणाऱ्या धुळीच्या मुख्य कारणांवर बोलताना ड प्रभागातील स्थापत्य विभागाचे अभियंता सुनील शिंदे यांनी सांगितले की, केवळ रस्त्याच्या कामामुळे धूळ उडत नसून, या भागात मोठ्या प्रमाणावर गृहप्रकल्पांची बांधकामे सुरू आहेत. या बांधकामांच्या ठिकाणी उत्खनन करून ये-जा करणाऱ्या मोठ्या ट्रक्सच्या टायर्ससोबत रस्त्यावर माती येते आणि नंतर वाहनांच्या वर्दळीमुळे या मातीची प्रचंड धूळ संपूर्ण परिसरात पसरते.

पुनावळे-ताथवडे परिसरातील नागरिकांना आणि येथील शाळांमधील विद्यार्थ्यांना होणारा त्रास कमी करण्यासाठी, लवकरच विशेष मनुष्यबळ लावून रस्ते पूर्णपणे स्वच्छ करण्यात येतील, असे आश्वासन ही शिंदे यांनी दिले . तसेच, केवळ स्थापत्य विभागच नव्हे तर पर्यावरण आणि आरोग्य विभागाशी समन्वय साधून, धुळीवर नियंत्रण मिळवण्यासाठी पुढील १५ दिवसांत पाण्याच्या फवारणीसह इतर आवश्यक त्या ठोस उपाययोजना करणे आवश्यक आहे.

# अनधिकृत इंटरनेट व टी.व्ही. केबल्स ऑपरेटर्सना महापालिकेचा इशारा



**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील रस्त्यावरील दिवाबत्ती व्यवस्थेच्या महानगरपालिकेच्या खांबांवरून काही संस्था व व्यक्तींनी टी.व्ही.केबल तसेच इंटरनेटसंबंधित केबल्स अनधिकृतपणे ओढल्याचे निदर्शनास आले आहे. या केबल टाकण्यापूर्वी महानगरपालिकेची कोणतीही पूर्वपरवानगी घेण्यात आलेली नसून, महापालिकेकडून अशा प्रकारची कोणालाही परवानगी देण्यात आलेली नाही, असे विद्युत विभागाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

महापालिकेच्या खांबांवरून अनधिकृतपणे ओढण्यात आलेल्या इंटरनेट व टी.व्ही. केबल्समुळे दुर्घटना होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच या केबल्समुळे महानगरपालिकेच्या विद्युत खांबांचे व त्यावरील विद्युत व्यवस्थेचे नुकसान झाल्याच्या घटनाही घडल्या असून, यामुळे सार्वजनिक सुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. या अनधिकृत केबल्समुळे शहराच्या सौंदर्यावरही विपरीत परिणाम होत असून, याबाबत अनेक नागरिक, अशासकीय सेवाभावी संस्था तसेच महानगरपालिकेचे पदाधिकारी व सदस्य यांनी महापालिकेकडे तक्रारी दाखल केल्या आहेत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील संबंधित तरतुदीनुसार, महानगरपालिकेच्या खांबांवर पूर्वपरवानगीशिवाय ओढलेल्या इंटरनेट व टी.व्ही. केबल्स या महानगरपालिकेच्या मालमत्तेवरील अतिक्रमण मानले जाते.

प्रत्यक्षात, कोणतीही केबल टाकण्यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या परवाना विभागाकडून रितसर परवाना घेणे बंधनकारक आहे. तसेच महानगरपालिकेकडून परवाना प्राप्त झाल्यानंतर, पिंपरी चिंचवड स्मार्ट सिटीद्वारे उभारण्यात आलेल्या 'ऑप्टिकल फायबर केबल' (OFC) नेटवर्कचा वापर करणे अथवा त्या डक्टमधून केबल टाकणे आवश्यक असल्याचेही महापालिकेने स्पष्ट केले आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रात कोणतीही नेटवर्क, टी.व्ही. केबल अथवा इतर प्रकारच्या केबल्स टाकण्यासाठी आकाशचिन्ह व परवाना विभाग, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांच्याशी संपर्क साधणे बंधनकारक राहणार आहे.

महापालिकेच्या विद्युत विभागामार्फत सर्व संबंधित केबल ऑपरेटर्स व इंटरनेट सर्व्हिस प्रोव्हायडर्स यांना पुढील कागदपत्रे त्वरीत सादर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे :

१) वैध परवाना

२) एमएसएमई / जीएसटी प्रमाणपत्र

३) केबल ऑपरेटरचे पूर्ण नाव, संपर्क क्रमांक, स्थानिक कार्यालयाचा पत्ता पुरावा व शॉप ॲक्ट परवाना

४) ऑपरेटरचे केवायसी तपशील – आधार कार्ड / पॅन कार्ड / ओळखपत्र माहिती

५) महापालिकेच्या एसओपी नुसार काम करणे, कामाच्या ठिकाणी सुरक्षिततेचे नियम पाळणे आदी बाबींसंदर्भातील योग्य रकमेच्या स्टॅम्प पेपरवरील हमीपत्र

६) टी.व्ही. / इंटरनेट / दूरध्वनी / वीजपुरवठा व इतर प्रकारच्या केबल्स ओव्हरहेड किंवा अंडरग्राऊंड पद्धतीने कोणत्या ठिकाणापासून कोणत्या ठिकाणापर्यंत टाकण्यात आल्या आहेत, याची तसेच एकूण लांबीची माहिती

७) ओव्हरहेड किंवा अंडरग्राऊंड केबलसाठी यापूर्वी महापालिकेस शुल्क अदा केले असल्यास त्याच्या पावतीची छायांकित प्रत

८) केबल टाकण्यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने दिलेल्या परवान्याची छायांकित प्रत

वरील सर्व कागदपत्रे ३० दिवसांच्या आत विद्युत विभाग, पहिला मजला, पिंपरी चिंचवड महानगरपालिका येथे सादर करावीत, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

निर्धारित मुदतीत माहिती व कागदपत्रे सादर न करणाऱ्या केबल ऑपरेटर्सविरोधात महापालिकेच्या अतिक्रमण विभागामार्फत कारवाई करण्यात येणार असल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे. तसेच अशा कारवाईमुळे जनतेस होणाऱ्या गैरसोयीसाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिका जबाबदार राहणार नसून, संबंधित केबल ऑपरेटर्स यांनाच त्यासाठी जबाबदार धरले जाईल, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

# खडकवासल्यातून सुमारे 2 कोटी लिटर पाणी गेले वाया

## उन्हाळी आवर्तनास बसणार तडाखा, दुरूस्तीसाठी चार दिवस

**पुणे | प्रतिनिधी**

खडकवासला धरणाच्या नवीन उजवा मुठा कालव्यास मुंढवा भागातील शिंदे वस्तीत (किलोमीटर २२) अचानक भगदाड पडल्यामुळे सुमारे २ कोटी लिटर पाणी (२० एमएलडी) वाया गेले. भगदाड कशामुळे पडले, याचे कारण अजूनही अस्पष्ट आहे. यामुळे उन्हाळी आवर्तनावर परिणाम होण्याची शक्यता आहे. दरम्यान, भगदाड भरण्यासाठी कि

# जिल्ह्यातील रस्त्यांची कामे 25 मेपर्यंत पूर्ण करण्याचे आदेश

## जिल्हा परिषदेकडून विकासकामांना गती; शिक्षण, आरोग्य व सौरऊर्जा प्रकल्पांवर विशेष भर

**पुणे | प्रतिनिधी**

पावसाळ्यापूर्वी रस्तेविकासाची कामे पूर्ण करण्याच्या उद्देशाने बांधकाम विभागाला सूचना देण्यात आल्या आहेत. जिल्ह्यातील रस्त्यांच्या डांबरीकरणाची सर्व कामे 25 मेच्या आत पूर्ण झाली पाहिजेत, असे आदेश प्रशासनाला दिल्याची माहिती जिल्हा परिषद अध्यक्ष वीरधवल जगदाळे यांनी पत्रकार परिषदेत दिली. रिक्त पदांचा प्रश्न ऐरणीवर